संक्षिप्त फौ.ख.क्र.०१/२०१८
सर-वि- विनायक
नि.क्र. १० च्या पुढे

सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नाव : चंद्रभान दुलाराव सावसाकडे
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : शेती
राहणार : खोलदोडा ता. भिवापूर जि. नागपूर.

सरतपासणी-सहा.सरकारी अभियोक्ता श्री. कन्नाके यांचे तर्फे

१. मी न्यायालयात उपस्थित आरोपीस ओळखत नाही. मला पोलीसांनी कोठेही बोलविले नाही. मी शेतावर जात असतांना पोलीसांनी माझी आलेसुर फाटयाजवळ सही घेतली. सही केव्हा घेतली त्याची निश्चीत तारीख मला सांगता येणार नाही. पोलीसांनी माझे समक्ष कोठलिही कार्यवाही केली नाही. आता मला घटनास्थळ वजा जप्तीपंचनामा मला दाखविला. त्यातील माझी सही मी ओळखतो. त्यातील मजकूर मला माहित नाही.

सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागीतली.परवानगी दिली.
उलटतपास - सरकार तर्फे

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १३.०८.२०१७ रोजी पोलीसांनी मला खोलदोडा आलेसुर रोड येथे पंचनाम्याकरीता बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातून १८० मि.ली. च्या देशी दारुच्या ४८ निपा व एक पॅशन प्रो मोटरसायकल जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी जप्त केलेल्या दारुच्या बॉटल पैकी एक बॉटल सी.ए.परीक्षणाकरीता वेगळी करुन सील करुन त्यावर माझी व पोलीसांची सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की ,पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला, तो मला वाचून दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी दुसरा पंच म्हणून नानाजी लक्ष्मण डउमल हा हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, संपुर्ण जप्तीची कार्यवाही माझे समक्ष झाली म्हणून मी आरोपीला ओळखतो व तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्याकरीता आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास- आरोपीचे वकील पुकारा केला असता -गैरहजर
३. आरोपीने उलटतपास स्वत: घेण्यास नाकारले
फेरतपास - काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत
माझे समक्ष,

स्वा/-
( वि. सं. डामरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर

दिनांक :२१/०८/२०१८